Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0013

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# जागतिकीकरणात स्त्रीमुक्तीची मागणी करणारी प्रज्ञा पवार यांची कविता

डॉ. सागर गवई
सहायक प्राध्यापक
स्व. भा. शिं. कला, प्रा. ना. गा. विज्ञान
व आ. गा. वाणिज्य महाविद्यालय साखरखेर्डा.
भ्रमणध्वनी - ९४९५४७७४३१
Email – sagarsgawai@gmail.com

*गोषवारा:- प्रज्ञा पवार यांची कविता स्त्रीवादाला फुले आंबेडकरी विचाराने नव्यारुपात पाहत स्त्रीमुक्तीची मागणी करते. जागतिकीकरणात स्त्रीचा माणूस म्हणून विचार व्हावा म्हणून जातसत्ता, वर्गसत्ता, धर्मसंस्था यांच्या बरोबरच नवभांडवली व्यवस्थेविरुद्ध एल्गार करताना महानगरीय बधीर संवदनेला नवे भान देत जागे करते.*

*Keyword - प्रज्ञा पवार यांची कविता, स्त्रीमुक्तीची मागणी, जागतिकीकरण*

*प्रस्तावना:-*

धर्मव्यवस्था आणि पुरुषप्रधान संस्कृतीच्या कचाट्यातून भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारामुळे स्त्री मुक्त होते न होते, तोच स्त्री जागतिकीकरणाच्या विळख्यात सापडली. भांडवलशाहीत स्त्रीला आकर्षक रुप मिळाले तरी, तिला भोगवस्तूच समजण्यात आले. जागतिकीकरणात जगातील सर्व महिलांचे प्रश्न सुटतील आणि लिंगभेद संपुष्टात येईल असेही आश्वासन देण्यात आले होते. त्याची काही उदाहरणे सांगण्यात आली. एखाद्या मल्टीनॅशनल प्रमुखपदी महिलेची निवड झाली आणखी कुठेतरी महिलेने भरारी घेतली, अर्थात हे सारेच खोटे नव्हते. पण अशा भरारी मारणाऱ्यांच्या संख्या हाताच्या बोटावर मोजावी इतकीही नव्हती. जागतिकीकरणचे विधायक लाभ सांगण्यासाठी हे सर्व सांगितले जात होते. पण हा 'भ्रमाचा भोपळा' होता हेही स्पष्ट व्हायला वेळ लागला नाही.

प्रभा गणोरकर यांच्या मते, "जागतिकीकरण हे लिंगभावयुक्त घटीत आहे. स्त्रीया आणि पुरुष यांच्यावर ते भिन्नभिन्नप्रकारे प्रभाव टाकते. लिंगाधारीत अन्यायाची नवीनवी रुपे आणि

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0013

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

तोटे जागतिकीकरणामुळे समोर येत आहे."१ यावरून जागतिकीकरणातील लिंगाधारीत अन्यायामुळे आर्थिकदृष्ट्या सर्वात खालच्या स्तरावर जीवन जगणाऱ्या स्त्रीला तिचे जीवनमान सुधारण्यासाठी कोणतीही उपाययोजना नाही.

सामाजिक न्यायाच्या संदर्भात स्त्रीयांवर जागतिकीकरणाच्या परिणामाचा वेध घेताना डॉ. आनंद तेलतुम्बडे, "जागतिकीकरणाने पुरस्कारलेल्या भोगवादी संस्कृतीने सर्वच स्तरातील स्त्रीयांना एक क्रय वस्तू बनवून सोडले आहे."२ असा निष्कर्ष व्यक्त करतात. याप्रमाणे पाहता जागतिकीकरणाची संकल्पना स्त्रीयांच्या संदर्भात सामाजिक न्यायाशी पूर्णतः विसंगत आहे. तात्पर्य, जागतिकीकरणाने आणलेल्या आर्थिक पुनर्रचनेचा सकारात्मक परिणाम भारतातील स्त्रीयांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीवर व सक्षमीकरणावर झाला नाही, उलट स्त्रीला वस्तूरुप प्राप्त होऊन तिच्या शोषणात वाढ झाली आहे.

मराठी कवितेमध्ये नीरजा, कल्पना दुधाळ, प्रज्ञा पवार यांनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर स्त्रीमुक्तीची मागणी करणारी कविता लिहिली आहे. प्रज्ञा पवार यांनी दलित व स्त्री असे दुहेरी शोषण दलित स्त्रियांच्या वाट्याला आले असल्यामुळे त्यांच्या सर्वंकष मुक्तीची मागणी प्रज्ञा पवार करतात.

जागतिकीकरणाने जे नवे पेच स्त्रीच्या जगण्यासमोर उभे केले आहेत. त्यांचे विश्लेषण प्रज्ञा पवार यांची कविता करते. प्रज्ञा पवार यांच्या कवितेचे आकलन मांडताना डॉ. माया पंडित म्हणतात, "एकाचवेळी अनेकानेक पातळयावर वावरणारी ही कविता अनेक सांस्कृतिक परंपरा नाकारते, आणि त्याचवेळी निवडक पंरपरांशी नातेही जोडते. तिची शब्दकळा आणि प्रतिमासृष्टी प्रस्थापित मराठी कवितेच्या अनेकानेक भाषिक पंरपराशीही नवे नाते जोडतेः तमाशापासून ते कलावादी प्रेरणेच्या कवितेपर्यंत, संतकाव्यापासून ते लावणीच्या अनेक शैलीपर्यंत, आणि मढेकरी कवितेच्या सौंदर्यलक्ष्मी सामर्थ्यापासून ते दलित, श्रमिक कवितेचा मेळ प्रज्ञाच्या लिखाणात दिसतो. दलित बहुजन स्त्रीच्या नजरेतून इतिहास लिहू पाहणारी प्रज्ञाची कविता मराठी कवितेला निश्चितच नवी दिशा देणारी आहे."३ अठरापगड जातीजमातीसोबतच समन स्त्रीच्या झालेल्या वस्तुकरणाचा निषेध ही कविता करते. तेव्हा ती प्रस्थापित व्यवस्था नाकारताना दिसते.

जागतिकीकरणाच्या क्रूर प्रक्रियेचा आता गावकुसावर होतो. इथल्या उतहतेशीय शोषक व्यवस्थासुद्धा स्त्रीच्या वस्तुकरणात सहभागी होताना बघून कवयित्री म्हणते,

'ही कत्तलखोर/लैगिक लूट/राजरोस/खुलेआम/माझ्या आया बहिणींची

शुगरलॉबी/सहकार/दुध उत्पादक संघ/झेडपी/सूतगिरण्या/ एमआयडीसी/
दौलतजादा करणाऱ्या/सत्तेच्या अन् मत्तेच्या/चिरेबंदी वाड्या'
(आरपार लयीत प्राणांतिक, पृ.क्र. ४३, ४४)

जागतिकीकरणात स्त्रीच्या लैंगिक शोषणाला जात सत्ता, वर्गसत्ता, धर्मसत्ता ही कारणीभूत ठरत आहे. झेडपीचे, शुगर लॉबीचे, विकासाच्या नावाखाली उभ्या राहिलेल्या महामंडळाचे, बाजारसमित्यांचे सत्तापिसाटांच्या टोलेजंग वर्चस्वाचे विक्राळ रुप स्त्रीचे लैगिंक शोषण करण्यास कारणीभूत ठरत आहेत. त्यांच्या सोयीच्या समाजकारणातून, धंदेवाईक सत्ताकारणातून आणि मतलबी राजकारणातून दलित, कष्टकरी, श्रमिक, बाईच्या शोषणाचे नवेनवे मार्ग उभे राहत आहे. नवभांडवलशाहीचे खरे स्वरुप उजागर करताना कवयित्री म्हणते,

'नवभांडवलशाहीचा / हा कराल वरवंटा
फिरतोय तुझ्या अस्सल / नितांत रंगावर
बहिष्कृतांच्या रंग विधानावर / अहमहमिकेनं लचकवली जातेय
विंचू चावला SS/रंगसफेदी करून / या महाकाय ग्लोबल स्क्रीनवरुन'
(आरपार लयीत प्राणांतिक, पृ.क्र. ४०)

अशा शब्दात कवयित्री वर्तमान स्त्रीच्या वस्तूकरणाचे प्रखर वास्तव रेखाटते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे स्त्रीच्या झालेल्या वस्तुकरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे पुराणापासून ते ग्लोबलायझेशन पर्यंतचा स्त्रीचा प्रवास मांडताना ती म्हणते,

'अधिसत्तेचा/पुराणकाळापासून / ग्लोबलायझेशनपर्यंत
'सह' जीवन / 'सं' भोग / 'सम' भाव / 'समा' नता / 'स्वा' तंत्र
समाजाबाहेर सोयीस्कर ढकलणं'
(प्रत्येकात असतं एक प्रियदर्शित्त्व, पृ.क्र. १०)

स्त्रीयांना धर्मशास्त्राच्या विषम लेखनाने मुख्य प्रवाहात येऊ दिले नाही स्वातंत्र्याची ६० वर्ष झाली तरी पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा स्त्रीकडे बघण्याच्या दृष्टिकोनात बदल झाला नाही. जागतिकीकरणाच्या दोन दशकानंतर तर जाहिरात, फॅशनच्या नावाखाली तिला आजही उपभोग्य वस्तू समजून स्त्री देहाचे उत्तान दर्शन घडवले जाते. त्यामुळे समता स्वातंत्र्य न्याय व बंधुत्व या माणूसमुल्यांची जोपासना होऊन माणूसमुल्यांच्या परिप्रेक्षातून स्त्रीकडे पाहिले जावे एवढी माफक अपेक्षा ती व्यक्त करते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने दाखविलेल्या गोडगुलाबी स्वप्नामुळे उतरंड उरणार नाही अशी अपेक्षा निर्माण झाली होती. परंतु जागतिकीकरणाने ही स्वातंत्र्यासारखाच भ्रमनिरास केला हे दुःख मांडताना कवयित्री म्हणते,

आपल्याला खेळवू द्यायचं नव्हतं / शरीराशी आणि तहानेशी

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0013

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

प्रत्येक संभोगानंतर संपूर्ण रिकाम्या होणाऱ्या / व्याकूळ पुरुषाला
शिरु द्यायचं होतं आपल्याला / आपल्याच अनादि कुशीत'
(ग्लोबल व्हिलेज, पृ.क्र. १७७)

वैश्विकीकरणाच्या काळात सगळयाच गोष्टीचे वस्तूकरण झाले. त्यात स्त्रीही अपवाद नाही. उलट तिला आघाडीवर ठेवण्यात आले त्यामुळे तिच्या लैंगिक अवहेलनेमध्ये भर पडली. ग्लोबल व्हिलेजात सापडेल आपल्याला आपली अस्सल कातडी?' या संदर्भातही तिचा पुरता भ्रमनिरास झाला. या प्रक्रियेमुळे लुटणे व ओरबडले जाणेच तिच्या वाट्याला आले त्यामुळे वैश्विकीकरणाच्या काळात सगळयाच गोष्टीचे वस्तूकरण झाले. त्यात स्त्रीही अपवाद नाही. उलट तिला आघाडीवर ठेवण्यात आले. जागतिकीकरणाच्या दमनकारी प्रक्रियेमुळे स्त्री-पुरुष व अन्य नातेसंबंधांना प्राप्त झालेले वस्तूरुप व त्यामुळे त्यांना कमी महत्त्वाचे म्हणून बाद करण्यात आले, माणसाला, स्त्रीला डावावर लावून तिचे शोषण करणारी ही व्यवस्था असल्याचे या कवितेतून सूचित होते. ग्लोबल संस्कृतीमध्येही स्त्रीचा झालेला हा भ्रमनिरास नेमकेपणाने यास कवितेत व्यक्त केला आहे.

'आपल्या हातून / सुटलं जंगल / सुटलं पाणी / सुटली जमीन / तुटली नाती
/ ग्लोबल व्हिलेजात सापडेल आपल्याला / आपली अस्सल कातडी?
(ग्लोबल व्हिलेज, पृ. क्र.६५)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम म्हणून जंगल, पाणी, जमीन व नातेसंबधातील ओलावा सुद्धा संपूष्टात आला. अशावेळी या ग्लोबलच्या व्हिलेजात माणूस आपले माणूसपण सुद्धा गमावून बसण्याची भीती कवयित्री व्यक्त करते. प्रज्ञा प्रवार यांनी त्यांच्या कवितेतून निखळ स्त्रीवाद मांडला आहे. स्वातंत्र्यानंतर स्त्रीयांवरील बंधने वाढतच आहे. तिचे बाजारीकरण सुरुच आहे.

जागतिकीकरणातील नव्या संघर्षात अजूनही ठिणगीचा सामना करावा लागतो. प्रज्ञा पवार यांची कविता आंबेडकरी बाण्याची व वैचारिक क्रांती कविता आहे, कारण फुले आंबेडकरांमुळे स्त्रीचे दास्यत्त्व संपले ही जाणीव व्यक्त करण्यासाठी 'स्व' अनुभव सामूहिकतेचा होतो आणि आशय अभिव्यक्तीचे अभिन्नत्व कवितेला प्रचंड ताकद बहाल करते. प्रज्ञा पवार यांनी आपल्या कवितेतून जागतिकीकरणाचे दलित समाजावर जे परिणाम झाले त्याची मांडणी केली आहे. जागतिकीकरणाचे परिणाम नोंदविताना कवयित्री म्हणते-

'गच्च ओसंडून वाहतो आहे / शॉपिंग मॉल / भूकेले हात
कुठल्या काऊंटरवर ठेवलीय / माझी कविता? / डिस्कांउटमध्ये विक्रीला !'
(मी भिडवू पाहतेय समग्रशी डोळा, पृ. क्र. ५७)

जागतिकीकरणाने अगदी विरोधाभासी स्थिती निर्माण केली. जागतिकीकरणच्या प्रक्रियेतून अगदी मोजक्या लोकांना प्रचंड पैसा मिळवून दिला. हा वर्ग चंगळवादाकडे वळला, लाखो लोक बेकार आले. या भीषण वास्तवाची अभिव्यक्ती कवयित्री करते.

जागतिकीकरणामुळे गावकूसं बदलत आहेत, आर्थिक सुबत्ता येत आहे परंतु समाजाची मानसिकता मात्र बदलत नाही. पितृसत्ता, जातसत्ता, वर्गसत्ता या व्यवस्थांना मात्र ही जागतिकीकरण ची प्रक्रिया हात लावू शकत नाही. उलट या प्रक्रियेला बळकटी प्राप्त करून देत आहे. डॉ. बबन भाग्यवंत प्रज्ञा पवार यांच्या कवितेचे आकलन मांडताना म्हणतात की, "स्त्री मुक्तीच्या चळवळीची सद्यकालीन दिशा आणि दशा याला छेद देऊन फुले-आंबेडकरी विचाराने स्त्रीवादाला नव्या रुपात पाहणारी प्रज्ञा पवार यांची 'मी भिडवू पहातेय समग्राशी डोळा' ही आंबेडकरी बाण्याची आणि वैचारिक क्रांतीची कविता आहे. जागतिकीकरणात स्त्रीयांच्या वाट्याला आलेलं दुःख, त्याची जाणीव प्रज्ञा पवार यांना आहे. माणूनच माणूस म्हणून तिची गणना व्हावी ही प्रमाणिक इच्छा व्यक्त करतात."[४] त्यामुळे प्रज्ञा पवार ची कवीता स्त्रीमुक्तीचे गीत गाताना माणुसकीचा गजर करते.

जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून तंत्रज्ञानवादी युगामुळे संवदेनाच्या अभावी परस्परां- पासून नाती गोती दूर होऊन महानगरीय जीवन कृत्रिम बनले असल्याची खंत प्रज्ञा पवार यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे त्यांची बालपणापासूनच बोथट होत जाणारी संवदेना प्रेमाअभावी परस्परापासून नाती गोती दूर होते हे वास्तव 'खेळ 'या कवितेतून प्रज्ञा पवार यांनी चित्रित केले आहे.

'बंद खोलीत कम्प्युटरवर खेळताहेत एक एकटी मुलं
अख्खच्या अख्खं जग त्यांच्या पुढ्यात
त्यांच्यासाठी आतडं तिळतिळ तुटण्याची वेळच आता संपून गेलीय'
(खेळ, पृ.क्र. २४)

कवयित्री प्रज्ञा लोखंडे यांची जडणघडण महानगरात झाली असल्यामुळे महानगरातील भेसूर जीवन तिच्या वाट्याला आले आहे. महानगरातील बधिर होत असलेल्या संवदेनाबद्दल प्रज्ञा पवार म्हणतात,

'हवा दूषित झाली आहे
अवघ्या महानगरावर प्रेतवत थंड बधिर संवेदना
मला जपायची त्यांच्या तान्हुल्या डोळयातही जगण्याची कोवळी धून'
(महानगर, पृ.क्र. २९)

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0013

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

कवयित्रिला महानगरात 'प्रेतवत थंड बधिर संवेदना' ची जाणीव झाली आहे. त्यामुळे 'तान्हुल्या डोळ्यातली जगण्याची कोवळी धून' जपण्याचा कवयित्री प्रयत्न करते.

थोडक्यात, प्रज्ञा पवार यांची कविता स्त्रीवादाला फुले आंबेडकरी विचाराने नव्यारुपात पाहत स्त्रीमुक्तीची मागणी करते..

**निष्कर्ष:-**

१.प्रज्ञा पवार यांची कविता जागतिकीकरणात स्त्रियांच्या होणाऱ्या शोषणाचे विविध संदर्भ उलगडून दाखवते.

२. ही कविता स्त्रीच्या वस्तुकरणाला विरोध करते व स्त्री मुक्तीची सर्वकंष मागणी करते.

३.प्रज्ञा पवार यांची कविता स्त्रीचा माणूस म्हणून विचार व्हावा यासाठी नवभांडवली व्यवस्थेला विरोध करते.

**संदर्भ : -**

१. शरद गायकवाड संपा. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे प्र. आ. २००९, पृ. क्र १३४

२. आनंद तेलतुंबडे , सामाजिक न्याय आणि जागतिकिकरण, लोक वाङ्मय गृह मुंबई, दु. आ. २०१०, पृ. क्र. ३४

३. प्रज्ञा पवार, आरपार लयीत प्राणांतिक, लोक वाङ्मय गृह मुंबई, दु. आ. २०१, पृ. क्र. २५

४. सूर्यकांता अजमेरा, संपा. जागतिकीकरण आणि मराठी भाषा, अथर्व पब्लिकेशन धुळे, प्र. आ. २०११, पृ. क्र. ५०